## प्रकरण पाचवे

### महदंबेच्या वाङ्‌मयाचे प्रेरणा व स्वरूप

धावळयाची प्रेरणा, धावळयाचे स्वरूप, धावळयाचा रचनाकाळ, धावळयाची भाषा व व्याकरण, तत्कालिन सामाजिक स्थिती, महदंबेचे मातृकी रुक्मिणी स्वयंवराचा विषय, मातृकी रुक्मिणी स्वयंवराची रचना, ग्रंथाचा प्रारंभ, काव्याची वृत्तबध्दता, भाषा व्याकरण, काव्यदृष्टया निरिक्षण, मातृकी रुक्मिणी स्वयंवरातील नाटय, तत्कालिन समाजस्थितीचे वर्णन, महदंबेच्या गर्भकांडाच्या ओव्या प्रेरणा आणि स्वरूप.

# प्रकरण पाचवे

## महदंबेच्या वाङ्.मयाचे प्रेरणा व स्वरुप

### धवळयांची प्रेरणा:

महदंबेच्या धवळयांचा जन्मोल्लेख गोविंदप्रभु चरित्रात आढळतो. गोविंद-प्रभुचरित्र हा महानुभावीय साहित्यातील दुसरा चरित्र ग्रंथ होय. तेराव्या शतकातील मराठी भाषेचे स्वरुप लक्षात घेण्याच्या दृष्टीने मराठीच्या अभ्यासकाला विशेष महत्व वाटते. गोविंदप्रभूंचे चरित्र निवेदन हे या ग्रंथाचे उदिष्ट असल्याने पंथीयांना व पंथेत्तराना हे अभ्यासनीय ठरते. महदंबेच्या धावळयाची पार्श्वभूमी याचे ग्रंथात पहावयास मिळते. यामुळे धावळयांच्या अभ्यासकास त्याकडे प्रथम वळावे लागते. "धावळे ही साहित्यकृतीकडे जाणारी वाट गोविंदप्रभुचरित्राकडे गेली आहे. त्यामुळे धावळयाच्या निर्मितीवर ते प्रकाश टाकू शकते व त्या रचनेमागे असणाऱ्या प्रेरणासंबंधीची माहिती गोविंदप्रभुचरित्रात मिळते ती अशी -

श्री चक्रधरांच्या निर्याणानंतर त्यांची सर्व शिष्य मंडळी गोविंदप्रभूंच्या आश्रयाला रिधपूर येथे आली. त्यात महदंबा होतीच. या ग्रंथातील महदंबे-संबंधीच्या काही महत्वपूर्ण उल्लेखावरुन ही माहिती आपणास मिळते. तिची संपूर्ण ओळख होणे शक्य नसले तरी तिच्या व्यक्तिमत्वाचे विशेष पैलू या चरित्रात आपणास सापडतात. महदंबेचा पहिला उल्लेख "गोविंदप्रभू" चरित्रा-तील १४व्या लीळेत सापडतो. त्यानंतर लीळाक्रमांक ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२ या लीळातून तो सलगपणे आला आहे. क्रमांक १२१, १२२, १३०, १३१, या लीळामधून थोड्याफार अंतराने तो येऊन क्रमांक २२४, २५३, ३१७, यात अनियमितपणे येऊन थांबला आहे. महदंबेशी संबंधित असलेल्या या १६ लीळापैकी २२४ ही लीळा विशेष महत्वाची आहे. ती गोविंदप्रभुंच्या

"विव्हावोस्विकारु" संबंधीची आहे. महदंबेने धवळे गाइल्याची आपणास प्रथम सूचना मिळते.

महाराष्ट्र सारस्वतकारांनी या प्रसंगाचे केलेले वर्णन थोडेफार दिशाभूल करणारे आहे. ते म्हणतात, "एकवेळी नवरदेव श्रीकृष्ण हे लग्नास तयार झाले आहेत अशी कल्पना करून व महदंबेस करवली समजून तिला गाणी गाण्यास सांगितले. त्यावेळी प्रेमळ अंत:करणाने महदंबेने गीते रचून गायिली. यात तिने सर्व कृष्णकथा गुंफली आहे.

वास्तविक गोविंदप्रभूनीच "विव्हावोस्विकारु"ची लीळा आरंभिली आहे आणि त्या निर्मितीने महदंबेला विवाहासंबंधीची गीते गाण्याविषयी सुचविले आहे. तो प्रसंग असा[२]-

मग महदाइसी धवळ गायिले, गोसावी म्हणतीले : "आवो मेली जाय गाय गाय म्हणे." महदाइसी म्हणतीले : "काइगाओ जी १" गोसावी म्हणतीले : आओ कृष्णरुक्मिणी गाय म्हणे : तुरया थाट गाय म्हणे" : आणि माहादाइसा स्फूर्ति झाली : इतुकेन रुक्मिणी-स्वयंवर गाओचि लागली १ -"नीरूता लागला जीवी" हे कडीवे गायिले आणि गोसावी म्हणीतले :" आवो होवो होवो : नीरूता लागला जीवी.

'गोविंदप्रभूंच्या' वाचकांच्या हे लक्षात येण्यासारखे आहे की, "विव्हावोस्वीकारु" ही लीळा गोविंदप्रभूंच्या अनेक लीळापैकी एक आहे. इथे गोविंदप्रभूव "विव्हावोस्वीकारु" या क्रीडेस प्रवृत्त झाले आहेत तेथे श्रीकृष्ण लग्नास तयार झाले आहेत अशी कल्पना करण्याचे व महदंबेने स्वत:स करवली. समजल्याचे ही प्रयोजन दिसत नाही. अर्थात तिने "कृष्णरुक्मिणी स्वयंवरा-संबंधीचे गीत म्हंटले असले तरी ते तिने यापूर्वी कधीतरी स्फुट स्वरूपात गाइल्याचे व गोविंदप्रभूनी ऐकले असल्याचे सूचित होते. गोविंदप्रभूनी महदंबेलाच

गाण्याचा आग्रह करणे व "काइ गावोजी ?" या तिच्या प्रश्नास "आवो कृष्ण रुक्मिणी गाय म्हणे" असे उत्तर देणे ह्या गोष्टीस विशेष महत्व आहे. "माहादाइसासि स्फुर्ति झाली : इतुकेन रुक्मिणी स्वयंवर गावोचि लागली :"या निवेदनात येणाऱ्या स्फूर्ति या शब्दातील अलौकिकत्वाचा भाग सोडून प्रेरणा झाली असा अर्थ घेणेच योग्य ठरेल. "रुक्मिणी स्वयंवर" गावोचि लागली यातील गावोचि हा शब्द गाण्यातील अखंडपणा सूचविणारा आहे. यावरुन महदंबेचे हे गाणे त्यामागील तिच्या गाण्याच्या एकूण प्रकृतीवर प्रकाश टाकल्याखेरीज राहत नाही. "निरुता लागला जीवी" हे कडवे तिने गाइले त्यास "आवो हो हो वो : निरुता लागला जीवी असा गोविंदप्रभूनी चोख प्रतिसाद दिला. ही गोष्टही गोविंदप्रभूंच्या अपेक्षापूर्तीची निदर्शकच म्हणावी लागेल. तेव्हा स्वत:स करवली समजून गीते गायिली ह्या विधानातून सुचित होणाऱ्या कृत्रिमतेचा, अवास्तव जाणिवेचा येथे मागमूसही आढळत नाही. महदंबा धवळे गाते ती करवली म्हणून निश्चितच नाही. तिची भूमिका कवयित्रीची आहे. "नीरुता लागला जीवी" असा अनुभूतीचा ध्यास लागलेल्या कलावंताची जी स्थिती तीच महदंबेची स्थिती होय.[3] मग चाऱ्ही दीस गोसावी रुक्मिणी सैवरं आइकिले : चौथा दीसी साडे जाले : मग प्रवृती भंगली असे गोविंदप्रभु चरित्र सांगते. तेही महत्त्वाचे आहे. "विव्हावोस्वीकारु" ही क्रीडाखरी पण त्यातही लग्न सोहळयातील धामधूम उडालेली दिसते. असे असता धवळयाच्या स्वरुपातील सलगता अखंडपणा पाहून आश्चर्य वाटल्याखेरीज राहत नाही.

√ धवळयाचे स्वरुप हे प्रासंगिक कवितेसारखे आहे. कवितेची प्रासंगिक स्वरुप दोन प्रकारचे असते.

१. विशिष्ट प्रसंगाची आधीच कल्पना करुन कविता रचणे व ती नंतर त्या प्रसंगी गाणे अथवा वाचणे.

२) विशिष्ट प्रसंग अनुभवत असतानाच काव्य रचना करणे धवळ्याची रचना हा दुसऱ्या प्रकारात मोडते. धवळ्याचे स्वरुप उत्स्पुर्त आहे. विशिष्ट प्रसंगातून ते जन्मास आले आहे हे खरे असले तरी धवळयाचा जो आशय आहे त्याची कथा वस्तू ती बराच काळ महदंबेच्या चिंतनाचा विषय बनलेली दिसते. या कथावस्तुचे लहान लहान धागे पकडून त्यांना काव्यबध्द करण्याचा महदंबेला छंद जडला होता. ही गोष्ट कित्येक प्रसंगातून सूचित झालेली आहे. तात्पर्य महदंबेचे "धवळे" वाटतात तसे.

स्वरुपाचे नाहीत "विव्हावोस्वीकारु" प्रसंगातून जन्मले आकृत झाले तरी त्याच्या संबंधीचा आराखडा महदंबेच्या मनात त्यापूर्वीच तयार झालेला होता. त्या विशिष्ट कथा वास्तूविषयीचे चिंतनही पुरेसे झालेले होते. एवढेच नव्हे तर दक्षितार्कंडिता कृष्णाकथापर ओव्या रचण्याच्या छंदाने तिला पूर्णपणे भारुन टाकले होते. धवळ्यासारख्या प्रासंगिक काव्यातून दिसणाऱ्या सलगपणाचे मूळ येथे गवसण्यासारखे आहे. त्यात ही धवळ्याची निर्मिती म्हटली तर सहेतुक आणि म्हटली तर अहेतुक आहे. याचे कारण असे की धवळयाची निर्माणाकर्तीपुढे पूर्णपणे विसरुन गेली असून ती आशयाशी एकरुप झाली आहे. "चवथा दीसी साडे जाले मग प्रवृती भंगली" असे सांगून श्रीगोविंदप्रभुचरित्रातील "विव्हावोस्वीकारु" चा प्रसंग संपतो. येथे गमतीदार प्रश्न पडतो तो असा श्रीगोविंदप्रभूचरित्राकांच्या अभ्यासकांना धवळ्याची रचनाच उपलब्ध झाली नसती तर त्यांनी धवळयाच्या स्वरुपाविषयी "विव्हावोस्वीकारु" या प्रसंगाच्या आधारे कोणत्या कल्पना बाळगल्या असत्या ? "विव्हावोस्वीकारु" चा हा प्रसंग महदंबेला "गाणी" गाण्याचा मिळालेला आदेश ती गाणीही श्रीकृष्ण रुक्मिणी स्वयंवराच्या संदर्भात म्हणावयाची अशी झालेली सूचना लग्न सोहळयात विशिष्ट प्रसंगी विशिष्ट मंगलगाणी म्हणावयाची असा आपल्या समाजात असलेला प्रघात आणि त्यातही "चौथी दीसी साडे झाले

असा श्रीगोविंदप्रभुचरित्रात असलेला विशिष्ट सोहळयाचा उल्लेख एवढयाच माहितीच्या आधारे जर आपण धवळयाच्या स्वरूपाविषयी आडाखे बांधण्याचा प्रयत्न केला तर आपली निश्चितपणे फसगत झाल्याशिवाय राहणार नाही. "धवळे" म्हणजे गोविंदप्रभूचे क्रीडास्वरूप लग्नसोहळयातील विशिष्ट प्रसंगी रचलेली आणि श्रीकृष्णासंदर्भात गायिलेली गीते असे समीकरण करण्याचा मोह आपल्याला झाला असता. प्रत्यक्ष स्वरूप असे आहे काय ते जर थोडेफार वेगळे आहे असे जाणवत असेल तर श्रीगोविंदप्रभू चरित्रामुळे धवळयाची पार्श्वभूमी समजली तरी धवळयाचे स्वरूप लक्षात येईल असे म्हणावे लागते.

धवळयाच्या निर्मितीसंबंधी गोविंदप्रभुचरित्र एवढीच माहिती देऊ शकते. "विव्हावोस्वीकारु" हा प्रसंग गोविंदप्रभुचरित्रात धूमकेतूसारखा आला आहे. त्या प्रसंगाच्या आधीच्या प्रसंगाचे अथवा नंतर येणाऱ्या प्रसंगाचे स्वरूप अतिशय भिन्न आहे. मराठीतील या आद्य कवयित्रीच्या काव्यनिर्मितीची पार्श्वभूमि व प्रेरणा सुचविणारा हा प्रसंग श्री गोविंदप्रभुचरित्रात जेवढा अनपेक्षित येतो तेवढयाच अनपेक्षितपणे जातोही. सतत परिभ्रमण करणाऱ्या श्रीचक्रधरांच्या चरित्रातही एक सुसंगती जाणवते. त्यात विस्कळीतपणा नाही असे नाही. पण असा विस्कळीतपणा प्रत्यक्ष जीवनातही नसतो का ? लीळाचरित्राचे वैशिष्टयच असे की त्यातील विस्कळीत लीळातूनही अखेर एक आकृतीबंध निर्माण होतो. त्यातील लीळातूनही एक क्रम जाणवतो. प्रत्येक लीळेचा रोख श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्वाकडे जातो आणि असे होत असतानाच श्रीचक्रधरांचे व्यक्तिमत्व सुस्पष्ट होत जाते. सुरवातीच्या कांही लीळा वाचल्या व त्या काळातील मराठी भाषेचा थोडा सराव झाला म्हणजे श्रीचक्रधरांच्या उक्ती व कृती यासंबंधीच्या वाचकांच्या कांही अपेक्षा निर्माण होतात व त्या एकीकडे पूर्ण होत असतानाच दुसऱ्या बाजूने श्रीचक्रधरांचे वाङ्मयचित्र साकार होत जाते. त्यामुळे लीळाचरित्रातील लीळा वर वर विस्कळीत वाटल्या तरी श्रीचक्रधरांच्या प्रत्यक्ष जीवनाचा आलेख सुसंगतपणे त्याच्या चरित्रात उतरल्याशिवाय राहत नाही.

श्रीगोविंदप्रभु चरित्राचे स्वरुप मात्र वेगळे आहे. गोविंदप्रभू हे अवतारी पुरुष खरे पण वेडाचारात दवडणारे आहेत. सामान्यांचा संसर्ग टाळण्याचा हा मार्ग फलदायी असला आणि श्रीगोविंदप्रभूंचा अध्यात्मिक अधिकार मान्य केला तरी लीळाचरित्राच्या तुलनेने गोविंदप्रभूंचे व्यक्तिचित्र गौण वाटते, श्रीचक्रधरांच्या व्यक्तिचित्रात एक एक रंग रेखीत जाणाऱ्या लीळा पहाव्यात आणि सामान्य तपशीलाने गजबजलेल्या श्रीगोविंदप्रभुचरित्रातील प्रसंगाकडे नजर टाकावी "विव्हावोस्वीकारु"ला घोणारे प्रसंगच इतक्या सामान्य स्वरुपाचे आहेत की, त्यामुळे "विव्हावोस्वीकारु"ने महत्व लक्षात येणे कठिण होऊन बसते. वास्तविक लीळाचरित्राचा लेखक तोच गोविंदप्रभूचरित्राचा लेखक असल्याने भिन्न प्रवृत्तीच्या लेखकामुळे येणारी भिन्न रचना पध्दती येथे निश्चितच आलेली नसणार. साहजिकच या दोन चरित्र ग्रंथांत आढळणारा फरक चरित्रनायकाच्या प्रकृती भिन्नतेतूनच आला असणे शक्य आहे.

तथापि कांही व्यक्तिच्या विशेषात: महदंबेच्या संदर्भात हा फरक खटकल्यावाचून रहात नाही. "लीळाचरित्राचे खास असे जे जग आहे त्यातील महदंबा ही प्रमुख व्यक्ती आहे. लीळाचरित्रातील महदंबा एक विदुषी म्हणून वावरताना दिसते. मात्र गोविंदप्रभू चरित्रात ती सामान्य वाटते. याचे कारण काय असावे, वास्तविक महदंबा म्हणजे चक्रधरांची पडछायाच. त्यांच्या आत्मनिवेदनामागे ती असलेली जणू प्रेरणाच. प्रवचनामागे अखंड सावध असणारी ती एक प्रश्नाकृतीच. अशा महदंबेला गोविंदप्रभू चरित्रात एवढे गौण स्थान का प्राप्त व्हावे? लीळाचरित्रात तिला अकारण महत्व देणे हे म्हाइंभटाच्या बाबतीत जेवढे असंभवनीय तेवढेच श्रीगोविंदप्रभूचरित्रात तिला अकारण गौणत्व प्राप्त होणे अशक्य नव्हे का ?

श्रीचक्रधरांच्या संपन्न व्यक्तिमत्वाच्या आश्रयाने विकसित झालेली तिच्या शिष्यांची मने गोविंदप्रभूंच्या सहवासात रमू शकली नाहीत. असे गोविंदप्रभू-

चरित्रा आणि स्मृतिस्थळ वाचत असता सतत जाणवल्याशिवाय राहत नाही. श्रीचक्रधर निर्याणानंतर महदंबा नागदेवास रिधपूरला चलण्याचा आग्रह करते. तो प्रसंग "मग माहादाइसी म्हणीतले । नागदेया गोसावियापासी चाला जाऊ, भटोबाशी म्हणीतले : के असते गोसावी माहादाइसी म्हणीतले हे नव्हेती रिधपुरी, श्रीगोसावी बोलावू पाठविले असे ? भटोबासी म्हणीतले माझा देवो तो श्रीचक्रधरस्वो:"[४]

यानंतर महदाइसा आणि नागदेव गोविंदप्रभूंच्याकडे आले असता गोविंदप्रभूंनी त्याला पाहाताच काढलेले उद्गार -

"तवं माहादाइसे भटोबासाते घेऊनि आली : श्रीप्रभू देखोनि म्हणितले : आवो मेली जाए : ये त्यें नव्हेति : श्रीचांगदेओराऊळांची : भटोबासा माहादाइसां थोर दु:ख झाले."[५]

अंतकाळापर्यंत चक्रधरांच्या माणसमूर्तीचे चिंतन करणाऱ्या महादाइसाचे जीवन चक्रधरमय होऊन गेलेले आहे. श्रीचक्रधरचरित्रात महदंबा एका उच्च पातळीवर वावरताना दिसते. लीळाचरित्रात महदंबेचा उल्लेख येतो, तेव्हा आपणास नकळत तिचा प्रश्न अपेक्षित असतो कारण हे प्रश्न फार महत्त्वाचे असतात. प्रश्नासाठी प्रश्न असे त्याचे स्वरूप नसते. ज्ञानाविषयीच्या खऱ्या तळमळीतून ते जन्म पावतात. श्रीचक्रधरांनी या प्रश्नांची दिलेली उत्तरेही तेवढीच महत्त्वाची ठरतात. श्रीचक्रधरांना असे सतत बोलावयास लावण्याचे दृष्टीने महदंबेचे हे प्रश्न फार उपकारक ठरले अशा प्रकारच्या संवादातूनच महानुभावी पंथाच्या ग्रंथाचे रूप सिध्द झाले.

महदाइसा व चक्रधर यांच्या संवादातून सिध्द झालेले श्रीकृष्णचरित्र धवळ्याच्या निर्मितीच्या दृष्टीने अभ्यासनीय आहे. या ग्रंथाचा प्रारंभ महादाइसाच्या प्रश्नाने झाला आहे. श्रीकृष्ण चरित्रातील महत्त्वाच्या

प्रसंगासंबंधी महादाइसेने विचारलेले प्रश्न व त्या निमित्ताने चक्रधरांनी केलेले निरूपण. निरूपणाच्या ओघातही होणारी प्रश्नोत्तरे अखेर महादाइसाचे होणारे समाधान अशी या ग्रंथाची रचना आहे. त्यातील प्रसंगाच्या सुरवातीस नियमितपणे येणारे व निरूपणाच्या ओघातही वारंवार येऊन या निरूपणाला सतत टवटवीत ठेवणारे महदंबेचे प्रश्न काढून टाकले तर श्रीचक्रधर निरूपीत श्रीकृष्णचरित्र कितपत स्वयंपूर्ण होईल हा एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होण्यासारखा असला तरी प्रत्यक्ष विषयाच्या कक्षेत तो येण्यासारखा नाही.

स्थूल मानाने पाहता श्रीचक्रधर निरूपित श्रीकृष्ण चरित्रात ७१ प्रसंगाची गुंफण केली असून त्यातील ६३ प्रसंगांची निर्मिती गुंफण केली असून त्यातील ६३ प्रसंगांची निर्मिती महादाइसेच्या प्रश्नातून झाली आहे. सात प्रसंगी इतर भक्तजनांनी प्रश्न विचारलेले असून शेवटचा प्रसंग सर्वस्वी वेगळया स्वरूपाचा आहे. कारण त्याचा प्रारंभ महादाइसेच्या प्रश्नातून नव्हे तर तिने गायिलेल्या ओवीतून झाला. संख्येने विपुल असणारे हे प्रश्न विविधतेने नटलेले आहेत.

महदंबेच्या कांही प्रश्नात पुराणिकांच्या स्पष्ट उल्लेख येतो येथेही पुराणिकांनी सांगितलेल्या श्रीकृष्ण चरित्राविषयीच्या कथांचा सच्चेपणा तिला पडताळून पहावयाचा असतो. श्रीकृष्णरुक्मिणी विवाहासंबंधीची कथा जी धावळ्याची ही कथा वस्तू आहे. तिला श्रीकृष्णाच्या निरूपणातून अशी प्राप्त झाली आहे. तशीच पुराणिकांच्या प्रवचनातूनही प्राप्त झाली असण्याची शक्यता लक्षात येते.

उदा: "एकु दी महदाइसी पुसिले : जी श्रीकृष्णचक्रवर्ती बहुते रूपे धरुनि ब्रह्मा-
भूलविला ऐसे पौराणिक बोलति हे साच जी ?"[६]

कित्येक प्रसंगी ढोबळ कथामुळे महदंबेचे समाधान होत नाही. तिला हवा असतो तो त्यातील तपशील कथानकातील बारकावे तिने हेरलेले असतात. श्रीचक्रधरांच्या निरूपणातील अशा को-या जागाकडे त्यांचे लक्ष वेधण्यासाठी प्रश्न विचारले जातात.

उदा: "महदाइसी पुसीले : जी जी श्रीकृष्णाचक्रवर्ती सांदिपणी पासौनि चौदा विद्या चौदा दिवसां अभ्यासिन्नलिआ की एकेचि वेळे एकेचि दिवसे चौदा विद्या अभ्यासिलिआ :" तसेच श्रीकृष्णचरित्रा निरूपणातील अर्धवट सुटलेल्या उप-कथांचे श्रीचक्रधरांना स्मरण देऊन त्यांच्या निवेदनात ती पूर्णता आणण्याचा प्रयत्न करताना दिसते.

उदा: "महदाइसी पुसिले जी जी : श्रीकृष्णचक्रवर्ती गोपिकासि स्यमंतक पंचकासि आफाउनि दर्शन दिन्हले : मग तेथ कैसे वर्तले जी:"[७]

महदंबेने विचारलेल्या कांही प्रश्नांचे स्वरूप मूलभूत असून त्यावरून तिच्या स्वतंत्र विचारशक्तीचा व चिंतनशिल मनाचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही. उदा: "एकादा वेळु महदाइसें सर्वज्ञाते पुसिलें : जी जी द्वापरी श्रीचक्रवर्ती सत्यभामे आधीन आणि एथ सर्वज्ञ बाइसां अधीन जी. देवा अधीन होइने ते नीकें की देवो आपणा अधीन कि जे ते निके : १[८]

श्रीचक्रधरनिरूपीत श्रीकृष्णचरित्रातील ज्या दोन प्रसंगाचा आता उल्लेख करावयाचा आहे त्याचे स्वरूप वैशिष्टय पूर्ण आहे. या प्रसंगाचा आरंभ महदंबेच्या प्रश्नाने होत नाही. तो तिच्या ओवी गायनाने झाला आहे. त्यापैकी पहिला प्रसंग असा "एकु दी महदाइसी ओवी गायिली.

अक्रूर भक्त : निर्वाणिचा माय : तेणे कृष्णाचे पाय : आलंगिले : हे आइकौनि सर्वज्ञ म्हणीतले : श्रीकृष्णचक्रवर्तीचा आक्रूर जरी भक्तू तरी स्वामीद्रोही तो कवनू : महादाइसी पुसिले : जी जी : आक्रूर स्वामीद्रोही तो कैसाजी :" आणि यानंतर येथेकंसासुराचे कथन.[९]

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती अशी : श्रीचक्रधर आणि महदंबा या दोघांचेही श्रीकृष्ण चरित्राविषयीचे चिंतन अखंडपणे चालू होते. फरक एवढाच की श्रीचक्रधरांचे चिंतन प्रकट होत असता गद्यरूप धारण करते. तर महदंबेचे चिंतन काव्यरूपात अवतरते. श्रीचक्रधरांचे निरूपण विशेषत: श्रीचक्रधरनिरूपीत श्रीकृष्णचरित्र काव्यबध्द करण्याचा महदंबेच्या वाणीला जणू ध्यास लागला आहे. श्रीकृष्णचरित्रातील विविध प्रसंगावर ओव्या गाणे ही महदंबेच्या कविमनाची एक सहज क्रीडा होती. तो तिच्या प्रतिभेचा एक छंद होता. महदंबेच्या ठिकाणी असलेल्या या काव्यनिर्मिती क्षमतेची चक्रधरांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच तिच्या या गुणाचे श्रीचक्रधरांनी मोठ्या आत्मियतेने पोषण केलेले दिसते. महदंबेच्या नित्य जागृत प्रतिभेला श्रीचक्रधरांच्या नित्यनेमाने सतत कथा पुरवल्याची साक्ष अशा प्रसंगातून मिळते. एवढेच नव्हे तर तिच्या माहितीत यत्किंचीतही उणीव राहू नये याबद्दल चक्रधरांचा असलेला कटाक्ष व त्याविषयी त्यांनी घेतलेली दक्षता या ओवी गाण्याच्या प्रसंगीही लक्षात आल्यावाचून रहात नाही.

श्रीचक्रधर निरूपीत श्रीकृष्ण चरित्रातील अखेरचा प्रसंग मन भारून टाकणारा आहे.

एक दी सर्वज्ञांच्या ठायी घानदाट स्थानि दाटली असे : अवघे भक्तिजन बैसले असती : सर्वज्ञ निरूपण करितु असति : तवं महदंबा राधावन धारामाजी सोजी कांडिता ओव्या गाते होती : मां आक्रुरा गीती गाइले:[१०]

अक्रूरा मङ्गळे : लवती पिंपळे :
कृष्ण संध्यावेळे : भेटतील ॥१॥
अक्रूरे घातेली : शाकून गांठी :
आजी द्वारके रायासी : होइलु भेटी : ॥२॥
कृष्णा अक्रूर : मूळ निगाला :
गोकुळ पावला : उत्साहेसी : ॥३॥

हाती माके वीडा : बत्तिसा पानांचा :
अक्रूर कृष्णाचा : निजभक्त : ॥४॥
अति संभ्रमित : अक्रूर भक्त :
अवस्वरु जाणवीत : अंगाजवळी : ॥५॥

या प्रसंगाचे वातावरण मोठे प्रसन्न आहे. श्रीचक्रधरांच्या अवतीभवती त्यांचा भक्तगण दाटीवाटीने बसला आहे. चक्रधरांच्या निरूपणाला थोड्या अवधीत प्रारंभ व्हावयाचा आहे. त्यांच्या प्रसन्न वाणीच्या स्पर्शाने सारे आसमंत उजळणार आहे. त्या क्षणाची भक्तगण मोठया उत्सुकतेने प्रतिक्षा करित आहे. सारेच वातावरण निस्तब्ध आहे. तोच रांधावन घरामाजी सोजी कांडिता ओव्या गाणा-या महदंबेचे स्वर पाझरत येतात. अक्रूराची कृष्णभक्ती हा तिच्या ओव्यांचा विषय आहे. इथे तिने पाच ओव्याची लड उलघडली आहे. त्यात श्रीकृष्णाच्या आठवणीने उदास झालेला अक्रूर शब्दांकित केला आहे. श्रीकृष्णस्मृतीने त्याच्या मनात हुरहुर भरून राहिली आहे. श्रीकृष्णसखा संध्याकाळी भेटेल असे त्याचे मन त्याला सांगत आहे. त्या उर्मीसरसी तो उठतो. शकुन गाठ घालतो. त्या श्रीकृष्णसख्यासाठी हाती बत्तीस पानांचा विडा घेऊन तो अत्यंत संभ्रमित अवस्थेत द्वारकेकडे निघाला आहे. श्रीचक्रधरांच्या वाणीला खा-या अर्थाने काव्यरूप दिले ते महदंबेने माहादाइ ही सर्व संत कवयित्रीच्या आधी अवघे जीवन ब्रम्हार्पण करून कृष्णरूप होऊन गेलेली होती.

धवळयाच्या निर्मितीमागे असणा-या प्रेरणांचा शोध घेण्यासाठी श्रीचक्रधर निरूपीत श्रीकृष्णचरित्राचा एवढया विस्ताराने विचार केला. धवळयांची कथावस्तू ही श्रीकृष्ण चरित्रातील अनेकापैकी एक अशी महत्त्वाची घटना होय. श्रीचक्रधर निरूपित श्रीकृष्णचरित्रात श्रीकृष्ण रूक्मिणी विवाहाचा प्रसंगही महदंबेच्या प्रश्नातूनच उद्भवला आहे. त्यावरून धवळयांच्या कथावस्तूवरील श्रीचक्रधराच्या वाणीचे संस्कार लक्षात घेणे अपरिहार्य ठरते आणि त्याच वेळी धवळ्याच्या अवतारास कारण ठरणा-या "गोविंदप्रभू

चरित्रातील" "विव्हावोस्वीकारु" या प्रसंगाचेही आपणास स्मरण झाल्याशिवाय राहत नाही.

धावळयांच्या निर्मितीचा प्रसंग श्रीगोविंदप्रभू चरित्राशी निगडीत असला आणि गोविंदप्रभूंनीमहदंबेला श्रीकृष्णरुक्मिणी विवाह गीत गाण्याची आज्ञा केली असली तरी हा सर्वच प्रसंग धावळयाच्या निर्मितीच्या संबंधात निमित्त मात्र ठरतो. हे विसरुन चालणार नाही. कारण "विव्हावोस्वीकारु" हा गोविंदप्रभूचरित्रातील एक योगायोग आहे. गोविंदप्रभूच्या भक्तजनांनी भिक्षेस जाणे, वाटेत महदंबेला बाशींग नेणारी तेलीन भेटणे, महदंबेने तशा प्रकारचे बाशिंग गोविंदप्रभूंसाठी मागणे तेलीनीने ते करुन देणे, गोविंदप्रभूंना लग्नसोहळा साजरा करण्याची प्रवृत्ती होणे, हौशी भक्तजणांनी असा सोहळा खरोखरच आरंभला असता. महदंबेने श्रीकृष्णरुक्मिणी विवाहगीते गाणे हे सारेच प्रसंग एक चमत्कारिक योगायोगच म्हणावे लागतील.

श्रीगोविंदप्रभूचरित्रातील "विव्हावोस्वीकारु" हा प्रसंग धावळयाच्या निर्मितीच्या संदर्भात निमित्तमात्र ठरला असला तरी त्याचे महत्व कमी लेखता येण्यासारखे नाही. कारण महदंबेने धावळे गाणे या गोष्टीला जे महत्व तेच हे धावळे ग्रंथबध्द होण्यालाही द्यावे लागते. महदंबेच्या धावळयांना ग्रंथरुप प्राप्त झाले ते केवळ गोविदप्रभूंच्या महानुभावी महत्वपूर्ण स्थानामुळेच होय. मात्र धावळयांच्या निर्मितीच्या बाबतीत श्रीगोविंदप्रभूंना प्राप्त होणारे श्रेय यामुळेच मर्यादीतही आहे. हे लक्षात घेणे जरुर आहे. कारण महदंबेच्या बौध्दिक व मानसिक शक्ति विकसित झाल्या त्या श्रीचक्रधरांच्या संपन्न सहवासातच तिच्या विचारशक्तिला जिज्ञासू वृत्तीला आणि कल्पनाला सतत साहित्य पुरविले गेले. ते श्रीचक्रधरांच्या निरुपणानेच आणि तिच्या व्यक्तिमत्वाची सर्व अंगे पोसली गेली तीही चक्रधरांच्या संस्कारामुळेच होय. धावळयांची निर्मिती ही एका अर्थाने चक्रधरांचीची निर्मिती आहे. चक्रधरांनी जोपासलेली

ही मोगरवेल गोविंदप्रभूंच्या दारात बहरावी हा एक योगायोग आहे.

अशा प्रकारे धवळ्यांच्या निर्मितीमागे असणाऱ्या प्रेरणांचे मूळ श्रीचक्रधर निरुपित श्रीकृष्णचरित्रात आहे हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजेच चक्रधरांच्या निरुपणाने धवळ्यांचे रुप सिध्द होण्यास हातभार लागलेला आहे. मात्र तो धवळ्यांची कथावस्तू असलेल्या श्रीकृष्णरुक्मिणी विवाहपुरताच मर्यादित करणे योग्य ठरते.

धवळ्याचे स्वरुप-

धवळ्याचे स्वरुप समजावून घेत असताना आपणास सुरवातीचा प्रश्न असा पडतो की नेमके धवळे म्हणजे काय ? तर, धवळे म्हणजे लग्नात करवली-कडून गाइले जाणारे गीत धवळ, ळा (एकवचन) व धवळे (अनेकवचन) यातील धवळ हा शब्द "धवळ" या संस्कृत शब्दावरुन आला आहे. धवल शब्द धव अधिक ल असा बनला आहे. याचा अर्थ लग्नात गावयाचे वर (धव) विषयक गीत.

धवल हा शब्द एकनाथांच्या रुक्मिणी स्वयंवरात सत्ता बैसली निज बोधीं। ढवळे गाती आनंदें" (१६/४६) असा येतो.[११] नरेंद्राने आपल्या "रुक्मिणीस्वयंवरात" तो अनेकवार वापरला आहे.[१२] (ओवी २७५३ इ.) मूळ "धवल" शब्द हेमचंद्राचे "छंदोनुशासन"[१३] सोमेश्वराचा "मानसोल्लास" व शार्ङ्गदेवाचा "संगीतरत्नाकर" यात आला असून गुजराती भाषेतील "धोळ" शब्द त्याच शब्दावरुन निर्माण झाला आहे. नैषध काव्यावरील नारायणभट्टाच्या संस्कृत टीकेतही तो शब्द येतो. या सर्व ठिकाणी सदर शब्दाचा विशिष्ठ गीतप्रकार हा अर्थ अभिप्रेत आहे.

धवळ्यांचा रचनाकाल:

धवळ्यांचा नक्की रचनाकाल सांगता येत नसला तरी तथापि त्यांचा

पूर्वार्ध ज्ञानेश्वरीपूर्वी निर्माण झाला, असे म्हणता येते. "ऋध्दिपुरलीला" वरून गोविंदप्रभूच्या हयातीत पूर्वार्ध रचिला गेल्याचे दिसते. या ग्रंथाच्या एका पोथीत गोविंदप्रभूचा निधानकाल "शाके १२०७ वे संवत्सरे भाद्रपद शुध्द अष्टमी जेष्ठा नक्षत्र अवसी पहारा आतु असा दिला आहे. स्मृतीस्थळाच्या पोथीत एकापानावर कांही मित्या मांडल्या आहेत. त्यात हीच मिती आहे. ऋध्दिपुरलीला व स्थानपोथी यांच्याही कांही पोथ्यात हीच मिती आढळते. या मितीत वाराचा निर्णायक असा उल्लेख नाही ही मोठीच उणीव आहे. पण ती गृहीत धरूनच पुढे वाटचाल करावयाची आहे. या मितीतील आलेला १२०७ हा शक सोडून त्या ऐवजी पिले-जंत्रीप्रमाणे गत-शक वर्ष १२०८ म्हणजे इ.स. १२८६-८७ घेतल्यास मग या मितीत शक, संवत्सर, तिथी व नक्षत्र यांचा मेळ बसतो. गतशक १२०८ व्यय संवत्सरे भाद्रपद शुध्द ८ला जेष्ठा नक्षत्र २४ घटि व २४ पळे असून बुधवार ता. २८ ऑगष्ट इ.स.१२८६ हा दिवस पडतो. त्या दिवशी जेष्ठा नक्षत्र सुर्योदयापासून दुपारी सुमारे १२ वाजे-पर्यंत होते. "अवसी" शब्दाचा अर्थ सकाळ होत असल्याने त्या दिवशीचे जेष्टा नक्षत्र बरोबर जुळते.

गतशाक १२०८ व चालु शाक १२०९ याचा अर्थ एकच आहे. गतशाक १२०८ किंवा चालु शाक १२०९ म्हणजे इ.स. १२८६-८७ या वर्षी व्यय संवत्सर येतो. मागील गतशाक १२०७ म्हणजे इ.स. १२८५-८६ या वर्षी पार्थिव संवत्सर तर पुढील गतशाक १२०९ म्हणजे इ.स. १२८७-८८ या वर्षी सर्वजीत संवत्सर येतो. यामुळे गतशाक १२०७ भाद्रपद शुध्द ८(ता. ९.८.१२८५ व गतशाक १२०९ भाद्रपत शु"८ (सोमवार तारीख १८.८.१२८७ या दोन्ही मित्या त्याज्य मानाव्या लागतात. संवत्सरावर भर द्यायचा तर गतशाक १२०८ या वर्षी व्यय संवत्सर येत असल्याने तेच ग्राह्य समजले पाहिजे. व्यय संवत्सर चैत्र शु।। ९ तारीख २५ फेब्रुवारी १२८६ ते फाल्गुन कृष्ण ३० ता. १५ मार्च इ.स.१२८७ या अवधीत होता. अर्थात शाके १२०८ पूर्वी केव्हातरी धवळयाचा पूर्वार्ध

निर्माण झाला. म्हणजे तो ज्ञानेश्वरीहून किमानपक्षी ४ वर्षांनी जुना ठरतो. हे खरे आहे. धावळयाचा उत्तरार्ध शाके १२३४ पूर्वी लिहिला गेला असे स्थूलमानाने म्हणता येईल.

धावळ्यांचा छंद:

धावळे समयक असून त्यात दर कडव्यात चार चरण येतात. कन्नड कविवर्य प्रा.द.रा. बेंद्रे[१४] धावळयांच्या छंदाचा उगम द्रविड अक्कर जातीच्या छंदात शोधतात. डॉ. ना.ग. जोशी यांनी मराठी छंदोरचना ग्रंथात धावळ्याच्या छंदाबाबत बरेच विवेचन केले आहे. त्यांच्या मते रचनेत अष्टमात्राक आवर्तन आढळतात. धावळ्याची रचना कांहीशी ग्रांथिक ओवीसारखी असून तीत कसलीही आवर्तने शोधणे व्यर्थ आहे. असा माझा ग्रह झाला आहे. त्यात कांही स्थळी अष्टमात्रक आवर्तनाचा आभास होत असेल, हे खरे, पण ते त्यांचे व्यवच्छेदक लक्षण खचित नव्हे. धावळे गायिलेले मी ऐकले आहेत व गातांना त्यांत अक्षरांची फारच ओढाताण होते । म्हणून धावळ्यांत गण, मात्रा, अक्षरसंख्या वा आवर्तने यांची अपेक्षा करणे निरर्थक आहे ।. ग्रांथिक ओवीचाहि हाच प्रकार आहे. मात्र धावळ्यांत सूक्ष्म लयबध्दता प्रतीत होते, यात शंका नाही या सर्व कारणामुळे धावळ्यांचा छंद "मुक्त ओवी" ठरतो, असे माझे अंतिम मत बनले आहे. ग्रांथिक ओवीवरून फेरफाराने बनलेली ती मुक्तओवी होय.

भाषा व व्याकरण:

धावळे वरवर चाळले, तरी त्यांच्या भाषेचा जुनेपणा प्रत्ययास येईल पुढील शब्द पहा -

१) दासपयास - हा शब्द शाके १०७९ च्या पळसगांवच्या शिलालेखात आला आहे.

२) देवांग - मूळ अपभ्रंश शब्द "देवंग""भविसयतक्हा" काव्यात हा शब्द

उपयोजिला आहे. अपभ्रंशात तो विशिष्ट वस्त्रांचे विशेषण म्हणून वापरतात, पण महानुभाव वाङ्.मयात तो वस्त्रविशेष या अर्थी नाम म्हणूनच वापरण्यात येतो.

३) सुहावना - शोभनकं (संस्कृत) - सुहावणाय (अपभ्रंश) - सुहावना "सुहावणाय" शब्दहि "भविसयत्तकहा" काव्यांत आढळतो "सुहावना हा शब्द हिंदी भाषेत रूढ आहे. (४) साडा - डे - शाट (संस्कृत) = साड (अपभ्रंश) = साडा "णाय" -"कुमारचरिऊ" या दुसऱ्या अपभ्रंश काव्यात हा शब्द योजिला आहे. ज्ञानेश्वरीत सापडणारे तर कितीकच शब्द धावळ्यांत दृष्टीस पडतात. मातु, वागर, बोणे हे कानडी व बळिये, आरोगणें (आरोगवूं) हे गुजराथी शब्दही त्यांत भेटतात. यापुढे धावळ्यांचे त्रोटक व्याकरण असे त्यावरून रुपप्रक्रिया विशद होऊन शिवाय अर्थबोधासहि मदत होईल.

१) वर्णप्रक्रिया: १. -हस्व स्वर -कुम (मा) री-ही अर्धमागधीची लकब. क्षाउ (क्षौ) र - महाराष्ट्रात औ बद्दल केव्हां केव्हां अउ पौरा दिषवऊ वररुचि .

२) दीर्घ - स्वर - मा (म) हादाइसी.

३) ऋबद्दल रु - रुसी. अपभ्रंशात हे रुप इकारयुक्त ज्ञानेश्वरपूर्वकालील मराठीत "रु(ऋ) ते" "ग्रि (गृ) ह" ही दोन्ही रुपे येतात.

४) संयुक्त स्वर - क्षो (क्षा) मा ५) स्वरभक्ति - सीरी (श्री) गीरी (उ.२५/४) इ.श्री.... । ३.६२ वररुचि. ६) स्वरागम (प्रोथेसीस) - अस्तव्यमान (उ.३१/४), नागरुअस्त्रीया (उ.५७/२) अस्तवन (उ.५८/४)-अ आगम निरर्थक,७)"य" श्रुति - (दाय) पसाय (प्रसाद), इय (=ज, पू. ४/४), पार्या (रिजा) तके (उ. १९/४) मागधीन ज बद्दल य - जो य : /११/४ वररुचि,८)अल्पप्राण मृदू व्यंजन - अनेगे (क) परी,९)महाप्राण कठोर व मृदू - सांधा (गा) वी, आख्या (क्षा) वाती, स (ह) त्री. १०)धस्वर - वो (ओ) गर , ११) ऊष्मे - सं.(शं) खा - शषो : स : । २.४३ वररुचि धावळ्यात श.ष ऐवजी प्राय: सकार येतो.

१२) महाप्राण ह – बहु (णु) मायां (उ २७/४२), १३) वर्णसंयोग – तृ (तुर) ग, नग्री (गरी), १४) वर्णवियोग – दरूस (र्श) ना, अपस (प्स) रा.

२) नामविभक्तिप्रत्यय: (अ) नामें – १ प्रथमा –रावो (पू २/३) अत ओत्सो : ५:१ वररुचि अंतु (पू. ३४/१) पूर्वोक्त ओचे उ हे –हस्वीकरण. धावळ्यांत उकार सडकून येतो. ही त्यांच्या प्राचीनत्वाची एक ठळक खूण होय. देव (पू.४६/१) – उ चे अ हे आणखी –हस्वीकरण. २) द्वितिया : चींता (पू. २/३) यादवांधे ८= ते, उ. ४६/४) ३ तृतीया – रुक्मिणी (पू २/१, ३१/३, ७८/४ इ.) बाळीं (पू ८/१, ८२/१), वरमायां बहुमायां (उ. २७/२), रत्नाचे हार (= हारांनी, पू. ७३/४ ), सांरगपाणी (८३/३), प्रजापती (उ. ३२/१) – "पंचवार्तिक" कारांच्या मते ही "प्रत्ययलोपी" तृतीया: वीस्व कर्मांनि (पू १४/४) – शाके ११६१ च्या नेवाशाच्या शिलालेखांत "पुरूषोणा" असे रुप येते, सर्व-भारेसी (पू. ३०/१) ४. चतुर्थी – ब्राम्हणां (पू. १६/२) रणासि (उ ५/२), रूक्मीणी (पू.७४/१) ही प्रत्ययलोपी चतुर्थी. ५. पंचमी – द्वारकेहुनि "ऊन" प्रायपात्न धातुसाधितापासून "हुन" प्रत्यय, ६. षष्ठी भिमाका (च्या) कुळी (पू.२/१) योगीता (–चा) वल्लभु (पू ३१/४) – ही रूपे धावळ्यांत अति विपुल. ज्ञानेश्वरीतील "भीष्मातर्ली" (१/१२३) ही ओवी पहा. तयांचा (= च्या) ठाइं (पू. ७/४), देवकीचया (पृ. ६९/१) शाके १२११ च्या उनकेश्वरच्या शिलालेखांत "सरभेणाचआ" हे रुप आले आहे. ७. सप्तमी – माडी (पू. ३०/४) – "माड" शब्द नपुसक लिंगी (नरेंद्र ओं ७०), बौलां (उ.१३/३) सति सप्तमी पवाडे आइकीलेसां (पू. ६४/४), ८. संबोधन – ताव्रा, वीप्रा.

सामान्यरूप – त्रिभुवनामाझारी – सामान्यरूप न केल्याची उदाहरणे खांदा (घा) वरि (पू. ५०/२), उपमा (मे प्रति (पू. ६६/२) (आ) सर्वनामे – १ प्रथमा – मी, तू २. द्वितीया – याते (उ. ८/२), ३. तृतीया – नियाऻ( (= तिने पू. २/२, १३/३, २२/२, उ. ९/४ इ.) या रूपाचा धावळ्यांत फार

सुकाळ आहे. मात्रा ते सर्वत्रा सर्वनामे नव्हे पू. ४९/३ येथे ते सर्वनामात्मक विशेषण होईल अर्थात प्राचीन मराठीत विशेषणालाही त्याच्या नामाची विभक्ति विकल्पाने लागत असल्याने येथील "तीया" शब्द तृतीया विभक्तीत आहे. ४. चतुर्थी - इय (= हिला, पू. ४/४), तयासी (उ. ११/३), ५. पंचमी त्याहीहुनि (पू. १५/४). ६. षष्ठी - काहयाचे (पू. १९/४), मज (=माझ्या, पू. ४५/२), माझेनि (पु. ४५/३) ज्ञानेश्वरकालीन मराठीत षष्ठीच्या प्रत्यया-बरोबर पुष्कळ दां "नि" आगम येतो, तो कानडीचा परिणाम होय, असे प्रा. जहागिरदार सांगतात. ७. सप्तमी - तयांतु (उ. २५/२)

३) क्रियाप्रत्यय १ वर्तमानकाळ - प्रत्यय त, ती - ताती, सी, य (ये) - ए - ठाकत (उ. १/४), जाणाती (पू. १५/१), निवताति (उ.२१/२) वरीसी (पू. ७/४), मीरवताय (पू. २७/४), गर्जताए (उ. ३३/३) उत्तरार्धात "आरूढ" (= आरूढे = आरूढतो, १/१, ५२/३, ५५/२), "प्रवेषास" (= प्रवेषो - से = प्रवेशातो, २६/४, ७०/१) ही चिंतनीय वर्तमानकाळी रूपे आढळतात. २. भूतकाळ - प्रत्यय:ला ऐल-लागला हरिखैला. धाके, उत्तरार्ध यांत "धारीया" (१९/३) व "भरीया" (१९/४) ही चमत्कारिक भूतकाळी क्रियापदे आली आहेत. ती कांहीशी हिंदी भाषेच्या धर्तीवर आहेत. ३) भविष्यकाळ - प्रत्यय : ऐल - न - देखिजैल, असैन. ४. आज्ञार्थ - आइकां, राहे, ५. अकरणारूप - नेदी (पू.३७/१), नेदरवेचि (पू. ७९/२), ६. कर्मणि - कीजे, दीजे, ७. तुमन्त पुसौ (लागला) पू. १०/२, (नेदी - पायां) लागों पू ३७/१, प्रणुं (यंति) उ. १४/४, बैसों दी दीधाली) उ. २९/२ मराठी तुमन्तावरहि कानडीचा परिणाम झाला आहे. असे प्रा. जहागिरदार वर उल्लेखिलेल्या लेखांत म्हणतात. ८ ल्य बन्त भरुनि, देखोनि, आइकौनियां,

४) निपात - १ पादपूरक - पा २ क्रियाविशेषण - नीरूता, झाणे (पू.४४/४, उ. १०/३), पुनतीपुनती, नी-हा, निच (उ.५१/१) ३. उभयान्वयी - जेव्हळी तेव्हळी, ज-ही, तरी नातरी, तवं ४, शब्द योगी, प्रति, सवे वांचौनियां, माझारी, भीतरी, समीप, मध्ये ५. उद्गारवाचक - वो, हो. (उ.४७/३)

वाक्यप्रचार - बीजे करणे ( = गमन करणे), वास पाहणे, (=तोंडाकडे पाहणे, पू. ४५/४), विफळ जाणे (= तोंडाकडे पाहणे, पू ४५/४), विफळ जाणे (= विव्हळ होणे, पू. ८०/२), हाती लावणे (= सोपविणे, उ. ५/४) येथ पर्यंतच्या विवरणावरुन धवळयांच्या भाषेचे स्वरुप स्पष्ट होते.

तत्कालीन सामाजिक स्थिती:

धवळयावरुन तत्कालिन समाजस्थितिची पुसट कल्पना होऊ शकते. त्यावेळी वाद्यात, निशाण, टाळ, शंक, तुरे, ही असत वाह्नात. घोडे, पाळख्या, अंबाऱ्या होत्या. तंबू होते (पू. ३२६/३) (मह्लीक) भांडारी हे अधिकारी असत राजे लोक आंगवळे (पू. ७२/४) बाळगीत तुरंगाची व्यवस्था होती.

महाराष्ट्रात इतर देशातून उंची कापड येई (उ.४१/१) पेरोज हा पारशी शब्द मोत्यांचा व्यापार मुख्यता मुसलमानाकडे होता. असे दर्शविती सोन्याचा भाव-कस १५ होता. पुरुषांच्या अलंकारात कुडगिया, साखाळियां, झाळबुके, तोडर यांचा आणि स्त्रियांच्या अलंकारात अंदू रत्नहार यांचा समावेश होई. अंगास चंदनाची उटी व कपाळावर कस्तुरीचा टीळा लावीत अन्नाला कापराचा सुवास देत. स्त्रिया नवऱ्याचे उष्टे खात पू.५८/३ मेव्हुणा थट्टेचा विषय असे (उ. १०/३) लग्नामध्ये ओखाण करणे तौलादि मर्दणे, लोणावाण, केळवाणं मूळन्हाण करणे रुकवत मर्दणे, लोणावाण, केळवाणं, मूळन्हाण करणे रुकवत देणे वरास बाशिंग बांधणे त्याला मंडपात शिरताना वधुमाय व वरमाय यांनी ओवाळणे नर्तकीचा नाच होणे (उ.२२/३) इ. सोहळे होत असत.

अशा प्रकारे आद्य मराठी कवयित्री महदंबेने निर्माण केलेली ही धवळे नामक काव्यसरिता मराठी साहित्यातील साहित्य भांडारात आपले भाव-अविष्कार घेऊन वहात राहिली आहे. ही धवळयांची काव्यसरिता ज्ञानेश्वर पूर्व निदान चार वर्षे अगोदर निर्माण झाली आहे. हे काव्य मराठी भाषा

भक्तास अपूर्व वाटेल.या पुढील कालखंडात आणखी कांही चांगली काव्ये निर्माण होतील किंवा सध्य स्थितीत असतील परंतु ही कृष्णरुक्मिणी स्वयंवराची काव्य किर्तीची द्वारकानगरी वैशिष्ट संपन्नतेमुळे धवळयाच्याच एका खांबावर स्थिर राहिल यात शंका नाही.

महदंबेचे मातृकी रुक्मिणी स्वयंवर - प्रेरणा व स्वरूप -

आद्य कवयित्री म्हणून मराठी साहित्यात महदंबेच्याच नावाचा उल्लेख केला जातो. व जवळ जवळ आता सर्वच जण या मताशी सहमत झालेले आहेत. आपल्या चर्चक, जिज्ञासक व पृच्छक वृत्तीमुळे महदंबेने महानुभावपंथीय साहित्यात खूपच मोलाची भर घातलेली आहे. ती जशी चर्चक होती त्याबरोबर प्रतिभासंपन्न होती. परंतु या सर्वांच्या जोडीला तिच्या प्रज्ञावंत स्वभावामुळे तिचे काव्य उत्कट व उत्स्फूर्त आहे. याचा प्रत्यय आपणाला तिने गाईलेल्या धवळयाचे वेळी आलाच आहे. तिची उत्स्फूर्तता आणि सूक्ष्म अवलोकन यामुळे धवळे हे मराठी साहित्यातील एक "शब्दशिल्पच" झाले आहे. आणि त्यामुळे महदंबेला आद्य कवयित्रीचा मान प्राप्त झाला आहे.[१५] महदंबेच्या धवळयामुळे काव्यातील उत्स्फूर्तता जाणवते. त्याचबरोबर महदंबेचे दुसरे काव्य म्हणजे "मातृकी रुक्मिणी स्वयंवर" होय या मातृकी रुक्मिणी स्वयंवराच्या रचनेतून महदंबेच्या ठिकाणी पांडित्य असल्याचे आपल्या प्रत्ययाला येते. मातृकी रुक्मिणी स्वयंवराचे प्रेरणा स्थान काय आहे व त्याचे स्वरूप कशा प्रकारचे आहे याची माहिती आपण पहाणार आहोत.

प्रेरणा:

महदंबा ही चक्रधरांच्या सहवासात आली आणि तिच्या ठिकाणी असणाऱ्या प्रतिभेला खऱ्या अर्थाने उजाळा मिळाला. महानुभावीय साहित्यात श्रीकृष्ण आणि त्याच्या लीला यांना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. आणि त्यामुळे महानुभावीय पंचकृष्ण पूज्य मानतात. भागवतातील दशम स्कंधावर

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

अनेक महानुभावीय कवींनी आपापल्या परीने निरुपण केलेलेच आहे. त्याच पध्दतीनेमहदंबेनेही अनेक ग्रंथांच्या श्रवणातून श्रीकृष्णलीला अवलोकील्या आहेत. आणि त्यातील शंका वकुशंका तिने चक्रधरांकडून समजावून घेतलेल्या आहेत. तो जेव्हा पुराण - श्रवण करुन येत असे तेव्हा ती नानाविध प्रश्न चक्रधरांना विचारुन पुराणाचा पडताळा घेत असे. अशाच एका प्रसंगी ती चक्रधरांबरोबर गप्पा मारत असताना चक्रधरांनी तिला रुक्मिणी स्वयंवर समजावून सांगितले आहे व तिच्या जिज्ञासू वृत्तीमुळे तिने हे कथानक जसेच्या तसे मनात साठवले आहे.

चक्रधरांच्या निर्याणानंतर त्यांच्या सर्व शिष्यांना घेऊन महदंबा गोविंद-प्रभूंच्या सहवासात आली आणि एक दिवशी सर्व शिष्य पाणीपात्राशी गेले. असता गोविंदप्रभूंना विवाह करण्याची इच्छा एका तेलीनीच्या हातातील बाशिंग पाहून झाली व त्यांनी महदंबेला आपली इच्छा सांगितली. महदंबेने लगेचच त्या तेलीनीला गोविंदप्रभूंच्यासाठी एक बाशिंग तयार करावयाला सांगितले. त्यावेळी महदंबा तेलीनीला म्हणाली, आवो तेलीनी : मेहरी एक बाशिंग आचुचिया गोसावियासी दे.[१६] आणि तिच्याकडून बाशिंग घेऊन तिने गोविंदप्रभूंच्या कपाळावर बांधले आणि नवऱ्याप्रमाणे गोविंदप्रभूना सजविले. "मग गोसावी म्हणीतले" "आवो मेली जाय गाए. गाए म्हणे महदाइसी म्हणीतले काइ गावोजी गोसावी म्हणीतले तुरया धाट गाए आणि महदाइसाशी स्फूर्ती झाली इतुकेन "रुक्मिणी स्वयंवर" गावोचि लागली[१७] व तिने रुक्मिणी स्वयंवर गावयास सुरुवात केली. परंतु हे लग्नप्रसंगी गाइले गेले. म्हणून त्याला धवळे म्हटले गेले. तो तत्कालीक स्फूर्तीने घाई घाईने रचल्यामुळे मनासारखा निटनेटके-पणा त्याच्यात उतरला नाही असे तिला वाटले असावे व म्हणून तिने त्याच कथानकावर मातृकी रुक्मिणी स्वयंवर हे काव्य पुरसतीने लिहिले असावे असे वाटते. कारण धवळयातीलच कथानक तिने मातृकी रुक्मिणी स्वयंवरात मातृकांत वृत्तात बांधले आहे.

रचनाकाल:

एकंदर मातृकी रुक्मिणी स्वयंवराचा अभ्यास करत असताना रुक्मिणी स्वयंवराचा रचनाकाल मात्र किती असावा याविषयी शंकाच रहाते. परंतु महानुभावीय पंथीय साहित्यात मातृकी – रुक्मिणी स्वयंवराच्या रचनाकालाविषयी कोठेही माहिती मिळत नाही. पण, हे निश्चित की, धावळयाचा कालावधी हा १२०९ हा आजतरी सर्वमान्य आहे. म्हणजेच मातृकी रुक्मिणी स्वयंवर हे १२०९ नंतर कधीतरी हे मातृकी रुक्मिणी स्वयंवर स्वत: रचलेले असावे.[१८] मातृकी रुक्मिणी स्वयंवराचा, निश्चित रचना कालावधी अज्ञातच आहे.

रुक्मिणी स्वयंवराचा विषय:

मातृकी रुक्मिणी स्वयंवराचा विषय हा कृष्ण रुक्मिणी यांच्या विवाहाची कथा साग्रसाने या काव्यात महदंबेने गुंफलेली आहे. त्याच्याच सुरुवातीलाच कृष्णवर्णन करण्यात आलेले आहे. पितांबर नेसलेला गळयात कुंदमाळा घातलेला असा श्रीकृष्ण शोभायमान आहे. अशा स्वरूपाचे वर्णन आलेले आहे. या मातृकी रुक्मिणी स्वयंवरात श्रीकृष्णालाच "दत्त" म्हटले आहे. यावरून महानुभावपंथी लोक श्रीकृष्ण आणि दत्त यांच्यात भेद मानत नसावेत असे दिसून येते. याचे वर्णन करताना महदाइसा म्हणाते.

"कासे पीतांबरु कंठी कुंदमाळा
कांतु शोभे सावळा : रुक्मिणीचा :
खांदावरि कावडी पडिभरे चालतु :
तो खेळे वणांतु : दत्तु सए :
गावो द्वारावती गोमतीए प्रांती :
गोदरीये क्रीडती : चक्रपाणी :
धावो देउनि अविधे घाली निजपदी :
खेळे कृपानिधि रिधपुरी :
चांपेगोर कांती : चांपयाच्या दृति
चांपौली साजती : चक्रपाणी :"[१९]

अशा प्रकारे श्रीकृष्ण स्वरूपाचे फार सुंदर वर्णन महदंबेने आपल्या प्रतिभा-संपन्न वृत्तीमुळे अतिशय रेखीव स्वरूपात केलेले आहे. या काव्यात श्रीकृष्ण आपल्या परिवारासह कौंडण्यापुरात कसा आला त्याने इथे पोहचण्याचा कसा प्रयत्न केला. याचेही वर्णन आलेले आहे. हे वर्णन करताना महदंबा म्हणते.

"जीणावेया वैरी जरासंधु समरी :
बीजे केले मुरारी : कौंडण्यासी :
झाळकती झालरी झोंपावती टके :
देखौनि मनी शाके : शिशुपाल :
झानानीति झोंगटा घांटा येकीदाटा :
पुढां चाले थाट : कुंजराचे :
येतु चक्रपाणी तुरांचा गजरी :
ते निहे अंबरी : उठीताति :
येत्रे येकनादे गर्जती अंबरे :
तेणे मेरुशिखरे : कांपताति :"
टाळ घोल वीणे टमक वाजती :
रथीं वारु चालती : पवनवेगी :
टाकीलें नगरु तुरांचे गजरु :
पातले जाळीकरु : भिमकाचे :
ठीकांचां भद्री उभी ठाकौनि रुक्मिणी :
पाहे चक्रपाणी : वल्लभाते :
ठीकला ध्वजुरथु माणिको शोभतु :
विप्र असे दाक्तु : भीमकी येते :
डोळस सावळा देखो भीमबाळा :
मेघाडंवरी मीळा : कृष्णरावो :
डोळे अश्रुजळी देह न संभाळी :
झोप तिये वेळी : घालु आहे :"[२०]

पुढे कृष्ण रुक्मिणीला अंबिकेच्या देवळास भेटीस बोलावतो, तेथे दोघांची भेट होते. त्यांच्या मनातील भाव स्थितिचे वर्णन ती करतेच, त्याच बरोबर रुक्मिणी अंबिकेच्या दर्शनाला गेली असतानाच श्रीकृष्ण तिचा हात धरतो व तिला रथात बसवतो. याचे वर्णन महदंबा अतिशय समर्थपणे करते.

"लीळावर्सें करु देऊनि मुरारी
रथीं वाइली कुमरी : भीमकाची :
लागौनि श्रीचरणा देखतां सकळां :
रुक्मिणी गोपाळा : माळ घाली :

त्याचबरोबर रुक्मानंद राजा आणि श्रीकृष्ण यांच्यातील लढाईचेही वर्णन केले आहे. त्याच रुक्मानंदाचा पराजय आणि रुक्मानंदाचे डोकीचे केस काढून त्याची कशी हेटाळणी झाली याचेही वर्णन म्हदंबेने केले आहे. लग्नात दिले गेलेले केळवण, बडाम, यासारख्या तत्कालीन लग्नपध्दतीतून दिल्या जाणा-या खाद्यपदार्थांचेही वर्णन अत्यंत सहजतेने चित्रित केले आहे. आणि, शेवटी हा विवाह संपन्न झाल्यानंतर नरनारींनी कृष्ण रुक्मिणीची काढलेली वरात, या वरातीचेही वर्णन अतिशय सहजतेने चित्रित केले आहे. रुक्मिणी स्वयंवराच्या शेवटी नागदेवाचार्यांची महती वर्णन करुन त्यांच्या चरणी सर्व भाव अर्पण करुन शेवटी या ग्रंथाची फलश्रुती सांगितली आहे. ही फलश्रुती सांगताना ती म्हणते -

वाचितां आइकतां देवाचे चरित्र :
होती प्रेमपात्र : शुध्द बुध्दि :

अशा त-हेने ज्यांनी या ग्रंथाचे वाचन किंवा श्रवण केले त्याला परमेश्वर सद्बुध्दी देतो. असे ती आपल्या ग्रंथाचे म्हात्म्य वर्णन करते.

मातृकी रुक्मिणी स्वयंवराची रचना:

महदंबेचे रुक्मिणी स्वयंवर हे दुसरे काव्य असून ते ११० ओव्यांचे आहे.

त्याची रचना ही "मातृका" वृत्तात आहे. एकूण ओवी संख्या १०९ आहे. व शेवटी ओवी तिच्या नावाची आहे. त्यात १ ते ८२ ओव्यात "क" ते "क्ष" पर्यंत मातृका आहेत व ८३ ते १०१ या ओव्यात पुन्हा "अ" पासून "उ" पर्यंत व नंतर "भ", "ट", "च", "द", "व", "म", "न", "व" असा अक्षरक्रम आहे. याची रचना अत्यंत सफाईदारपणाची आहे. लयबध्दता व निवेदनाची गतिमानता ही या काव्याची वैशिष्टये होत. या कथानकात आटोपशिरपणा असून कुठेही पाल्हाळ नाही. कृष्णवर्णन विप्राची पाठवणी कृष्णदर्शनामुळे रुक्मिणीने सज्जा-वरून उडी घेणे इत्यादी प्रसंग धावळ्यामधून जसेच्या तसेच येथे आलेले दिसतात. कांही शब्दांची ही पुनरावृत्ती जाणवते आणि म्हणूनच आद्य मराठी कवयित्री या आपल्या पुस्तकात वा.ना. देशपांडे म्हणतात, "मातृकी रुक्मिणी स्वयंवर म्हणजे धवळे या ध्वनीचा शुध्द प्रतिध्वनी होय" व हे त्यांचे हे मत यथार्थ आहे.

## ग्रंथाचा प्रारंभ:

मातृकी रुक्मिणी स्वयंवर हे ओवीबध्द लघुकाव्य आहे. त्याच्या रचनेत महदंबेने थोडी चमत्कृती साधली आहे. ही चमत्कृती त्याच्या नावातच दिसते. कारण त्यात भाषेच्या ५२ मातृका ओव्यांच्या प्रारंभी क्रमाने येतात. याच्या सुरवातीस कृष्णवर्णन आलेले आहे. ते अत्यंत सौंदर्यपूर्ण आहे. त्यानंतर श्रीकृष्ण आपल्या परिवारासह कौंडण्यपुरात आलेल्याचे वर्णन आहे. रुक्मिणी अंबिकेच्या दर्शनास येते आणि कृष्ण तिचा हात धरून तिला रथात बसवतो अशा प्रकारे ग्रंथप्रारंभ झालेला आहे. धावळ्यांप्रमाणे रुक्मिणी स्वयंवरात मात्र सुरवातीला गुरूवंदन नाही. तर प्रत्यक्ष श्रीकृष्ण वर्णनानेच रुक्मिणी स्वयंवर काव्याची सुरवात झालेली आहे.

## काव्याची वृत्तबध्दता:

मातृकी रुक्मिणी स्वयंवर हे काव्य मातृका वृत्तात असून त्याची रचना ओवीबध्द आहे. यासाठी तिने ओवी याच वृताचा वापर केलेला आहे. असे

स्वत:हा महदाइसाच म्हणाते.

"जाले हे संपूर्ण रुक्मिणी सैंवर :
मातृकी नागर ओवीबंधी ।"

डॉ. वसंत जोशी म्हणतात त्याप्रमाणे पंडिती वळणाची ठिकठिकाणी रचना जाणवते. स्मृतीत सांगितल्याप्रमाणे "यदे घडवू घडवू बांधल्याची जाणीव ओवी ओवीतून होते" अगदी सुरवातीस १ ते ८२ ओव्यातून "क" ते "क्ष" पर्यंत मातृका आहेत. ८३ ते १०१ ओव्यात पुन्हा "अ" ते "उ" पर्यंत व नंतर "भ", "ट", "च", "द", "व", "म", "न", "व" असा क्रम आहे. ही रचना थोडीसी चमत्कृतीपूर्ण आहे व ती पांडित्यपूर्ण आहे. पण तरीही कांही ठिकाणी विस्कळीतपणा जाणवतो. धावळ्यातीलच कथा शैली बदलून "ओवी" या छंदात बध्द केली आहे.

भाषा व व्याकरण:
---

मातृकी रुक्मिणी स्वयंवराची भाषा पांडित्यपूर्ण आहे. आणि हे संपूर्ण काव्य मातृका वृत्तातअसून "ओवी" हा त्याचा छंद आहे. परंतु कांही ठिकाणी याची रचना ओवीबध्द नसून ती अभंगच आहेत. त्याची भाषाशैली नागर आहे. व्याकरणादृष्टया कडव्यातील आद्यक्षरात मातृका आणल्या असल्या तरीही त्यात असावी तितकी शिस्त दिसून येत नाही. तर कांही ठिकाणी तिला कृत्रिमता प्राप्त झाली आहे. परंतु मातृकी रुक्मिणी स्वयंवर काव्य-दृष्टया सरस आहे.

काव्यदृष्टया निरीक्षण:
---

मातृकी रुक्मिणी स्वयंवराचा विषय हा प्रामुख्याने कृष्ण रुक्मिणी स्वयंवरच आहे. आद्य मराठी कवयित्री महदंबा हिची ही पांडित्यपूर्ण रचना आहे हे काव्य अभंगबध्द असून त्याला विशिष्ठ्य प्रकारची गेयता प्राप्त झाली

आहे. साधेपणा हा या काव्याचा प्राण होय. रचनेचा सफाईदारपणा, लयबध्दता निवेदनाची गतिमानता ही या काव्याची वैशिष्टये आहेत. या काव्य कथानकात आटोपशिरपणा असून कुठेही पाल्हाळ नाही. परंतु कांही ठिकाणी शब्दांची पुनरावृत्ती जाणवते आणि त्यामुळे हे कथानक प्रवाही झालेले आहे. कांही ठिकाणी शृंगार रसाने हे काव्य नटलेले आहे. जसे -

चालीले वधुवर पाठउनि लोकां :
येकांती प्रेमसुखा : रुक्मिणीसी : ॥ १०४ ॥
देऊनि आलींगन अनुभवींले सुखा :
रतीचा वीशेष : तेची जाणे : ॥ १०५ ॥
वोतवर सुख तारुण्याचा भोगु :
जाणे तो श्रीरंगु : सृष्टीमाजी : ॥ १०६ ॥

अशा अनेक वैशिष्टयांनी मातृकी रुक्मिणी स्वयंवर हे काव्य संपन्न आहे. परंतु काव्य दृष्टया त्याच्यात कांही त्रुटी जाणवतात या काव्य कथानकाच्या शेवटी ही रचना विस्कळीत झालेली आहे. वृत्तशैथिल्य पुनरुक्ति " "यमकाभाव" ढिलाईची यमके ही प्रामुख्याने आपल्या दृष्टोत्पतीला पडतात. परंतु तरीही धावळयांपेक्षा मातृकी रुक्मिणी स्वयंवराची रचना प्रमाणबध्द आहे. आणि म्हणूनच महदंबेच्या पांडित्यांची चमत्कृती लाभल्याने हे काव्य वाचणीय तर झालेच आहे तसेच ते श्रवणीयही आहे आणि त्याचमुळे "मातृकी रुक्मिणी स्वयंवर" हे लघु-कथाकाव्य आहे.

## मातृकी रुक्मिणी स्वयंवरातील नाटय

मातृकी रुक्मिणी स्वयंवर हे जणू कांही काव्यनाटयच आहे. याचे प्रत्यंतर मातृकी रुक्मिणी स्वयंवरात वेळोवेळी आलेले आहे. काव्याच्या सुरवातीसच सौंदर्यालंकारानी नटलेला श्रीकृष्ण हा नाटयमय वाटावयास लागतो तर

रुक्मानंदाला हरवून त्याच्या डोक्याचे केस काढून त्याची केलेली थट्टा ही नाटयमय आहे. रुक्मिणी अंबिकेच्या दर्शनास गेली असता श्रीकृष्ण तिचा हात धरतो व तिला रथात बसवितो. हेही नाटयमय चित्रण आहे. श्रीकृष्ण रुक्मिणीची वरात ही . नाटयमय शब्दचित्र आहे. तर श्रीकृष्णाला पहाताच ती मांडीवरुन उडी घेते तो प्रसंगही नाटयमयच आहे. एकंदर रुक्मिणी स्वयंवर हे जणू नाटयकाव्यच आहे असे वाटावयास लागते.

तत्कालीन समाजस्थितीचे वर्णन:

मातृकी रुक्मिणी स्वयंवरात तत्कालीन सामाजिक स्थितीची कल्पना आपणास येते. तत्कालीन स्वयंवरात वराती काढल्या जात असत. नवरा-नवरीला हळद लावली जात असे. नवरीकडून नवऱ्याला बडाम, केळवण दिले जात असे. वरातीचे वेळी वेगवेगळी वाद्ये वाजविली जात. त्या वाद्यात निशाण टाळ, शंख, तुरे यासारखी वाद्ये वाजविली जात. नवरदेवाला, व नवरीला सजवले जाई. नवरीच्या हातात चुडा भरला जात असे. नवरा-नवरीला आंघोळी घातल्या जात. नवरा नवरीला अंबारीत बसवून त्यांची वरात काढली जाई. उत्तम प्रकारची वस्त्रे, भूषाने, अंगावर घातली जात. डेरे उभारले जात. वहानात रथांचा वापर केला जाई. पुरुषांच्या अलंकारात कडी, गोफ, कुंडले, तोडे, याचा वापर केला जाई. अंगास चंदनाची उटी लावली जाई. कपाळावर कस्तुरीचा टीळा वराला मंडपात शिरताना अनेक सुवासिनी ओवाळीत असत. नर्तकीचे नाच होत,अशा पध्दतीने तत्कालीन समाजपध्दतीत ऐश्वर्य संपन्नता असलेली दिसून येते.

आद्य कवयित्री महदंबा हिचे "मातृकी रुक्मिणी स्वयंवर" हे कथाकाव्य असून कृष्ण रुक्मिणी विवाह याच्यात चित्रित झालेला आहे. धवळयातील आशयच मातृकी रुक्मिणी स्वयंवरात सांगितला गेला आहे. परंतु वृतबध्दतेमुळे या कथाकाव्याला महदंबेच्या व्यक्तिमत्वाच्या ठिकाणी असलेल्या पांडित्याची

सुवर्ण किनार प्राप्त झालेली आहे आणि त्याचमुळे धवळयात जो विस्कळीतपणा होता तो विस्कळीतपणा मातृकी रुक्मिणी स्वयंवरात मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत नाही. मातृकी रुक्मिणी स्वयंवराचा एक विशेष म्हणजे त्यांच्या संपूर्ण कडव्यातील आद्याक्षरात मातृका आणल्या आहेत व त्याचा योग्य रितीने वापर केला गेला आहे.

धवळे रचून झाल्यानंतर त्याच्यात जो मिटनेटकेपणा उतरला नाही असे महदंबेला वेळोवेळी वाटत होते आणि म्हणूनच तिने त्याच कथानकावर कांही कालानंतर मातृकी रुक्मिणी स्वयंवर रचले असावे असे वाटते. धवळयाच्या सुरवातीस येणारे गुरुनमन मात्र मातृकी रुक्मिणी स्वयंवराच्या सुरवातीस आलेले नाही. त्याचे कारणमात्र कांही समजत नाही. याच्यातील हा फरक पाहून कांही विचारवंताच्या मते मातृकी रुक्मिणी स्वयंवर हे धवळे लिहिणाऱ्या महदंबेचे नाही तर ते महदाइसाची पणजी महदंबाइचे आहे असे डॉ. पारखी म्हणतात.[४] परंतु हे मत मात्र सर्वमान्य नाही. डॉ. पारखी यांच्या मताचे खंडन मुरलीधर शास्त्री यांनी केले असून त्याचा मान त्यांनी महदंबेलाच दिलेला आहे.[५]

मातृकी रुक्मिणी स्वयंवर जरी वेगळे असले तरी देखील त्याचे कथानक मात्र धवळयाचेच आहे. याचे कारण असेही असावे. महानुभावी यांना कृष्णलीलाने भुरळ घातलेली आहे. कृष्णलीला याच त्यांचे पूजास्थान झालेले आहे. आणि म्हणूनच कदाचित महदंबेने तोच विषय वृत्तबध्द केलेला असावा. सौंदर्यपूर्ण शैली काटेकोर रचना नाटयमय शब्दचित्राण अत्यंत सार्थ झालेले आहे. याच्यातून महदंबेची प्रतिभा अखंड तेवत राहिलेली प्रत्ययाला येते. एकंदर मातृकी रुक्मिणी स्वयंवराच्या ११० ओव्या वा.ना. देशपांडे यांनी आद्य मराठी कवयित्री या त्यांच्या पुस्तकात संपादित केलेल्या आहेत. परंतु पुढे

मात्र वेगळ्या अक्षरात "जास्तीची कडवी" म्हणून ७९ कडवी बारीक अक्षरात निराळी छापली आहेत. लक्षापूर्वक पाहिल्यास ती पहिल्या ११० कडव्यांच्या रचनेसारखीच आहेत. कोठेही फरक पहावयास मिळत नाही. ही ७९ कडवी मात्र त्यांनी स्वतंत्र का छापली याचे उत्तर मात्र सापडत नाही. पहिल्यांदा दिलेल्या यादीत महदंबेने चक्रधरांना वंदन केलेले नाही. या जास्तीच्या कडव्यात मात्र श्रीदत्त आणि चक्रधरप्रभूंना तिने नमन केलेले आहे. एवढा फरक वगळता म्हणावा तितकासा फरक या दोन्ही प्रतीत सापडत नाही. धवळ्यात केलेले नमन आणि जास्तीची कडवी याच्यातील नमन याच्यात मात्र फरक आहे. जास्तीच्या कडव्यात महदंबा म्हणते,

"श्रीदना चक्रपाणी कृष्णा जी नागरा :
श्रीप्रभू चक्रधरा नमन माझे ।"

अशा प्रकारे महानुभावातील पंचकृष्णांना तिने वंदन करून ही जास्तीची कडवी लिहिली आहेत. मातृकी रुक्मिणी स्वयंवराची याच्यातील खरी प्रत कोणती याविषयी शंका निर्माण होते. परंतु फरक तो एवढाच की जास्तीच्या कडव्यात नमन आहे आणि वा.ना.देशपांड्यानी संपादित केलेल्या पहिल्या प्रतीत ते नाही. परंतु यामुळे खूप मोठा कांही फरक पडत नाहीत.

आद्य कवयित्री महदंबा हिचे मातृकी रुक्मिणी स्वयंवर हे पंडिती वळणाचे अत्यंत काटेकोरपणे लिहिले गेलेले कथाकाव्य आहे. म्हणून वा.ना. देशपांडे म्हणतात धवळे या ध्वनीचा मातृकी रुक्मिणी स्वयंवर हा शुध्द प्रतिध्वनी आहे.[६] आद्य कवयित्री महदंबेचे मातृकी रुक्मिणी स्वयंवर म्हणजे महदंबेच्या पांडित्यपूर्ण प्रतिभेची गंगोत्रीच आहे.

## महदंबेच्या गर्भकांडाच्या ओव्या प्रेरणा आणि स्वरुप:

आद्य कवयित्री महदंबा हिच्या नावावरील आणखी एक प्रकरण म्हणजे "गर्भकांडाच्या ओव्या" हे होय. ज्या ज्या वेळी महदंबा दळण-कांडण यासारखी कामे करत असत त्या त्या वेळी ती ओव्या गात असे. या ओव्यांचे स्वरुप "उत्स्फूर्त" आहे. स्त्री सुलभ वृत्ती ही त्यातून चित्रित झाली आहे. तिने चक्रधर नागदेवाचार्य गोविंदप्रभू यांच्यासाठी वेळोवेळी ओव्या गायिलेल्या आहेत. या गायिलेल्या ओव्या म्हणजेच "गर्भकांडाच्या ओव्या होत" या तिच्या ओव्या अंतर गर्भातून जिव्हाळ्यापोटी गायिल्या गेल्या आहेत. परंतु या सर्व ओव्या अभ्यासावयास मात्र मिळत नाहीत. या गर्भकांडाच्या ओव्यांची संख्या सुमारे ७५ इतकी आहे. या गर्भकांड ओव्या उपदेशपर आहेत. परंतु त्यांना निरसता प्राप्त झाली आहे. या गर्भकांडाच्या ओव्याची प्रेरणा म्हणजे तिचे चक्रधर या गुरुविषयांचे असलेले प्रेम होय. चक्रधरांवरील तिची माया हीच या ओव्यांना कारणीभूत आहे. महदंबा काशी यात्रेला जेव्हा जाण्यासाठी निघाली तेव्हा महदंबेने चक्रधरांना तांदळाचा स्वेत आहार करुन घातला होता. त्याही वेळी तिने चक्रधरांसाठी कांही ओव्या गाईल्या होत्या. परंतु या ओव्या मात्र आज सत्य स्वरुपात उपलब्ध नाहीत. डॉ. अ.ना. देशपांडे "आद्य मराठी कवयित्री"या पुस्तकात या गर्भकांडाच्या दोनच ओव्या सापडतात. या पहिल्या ओवीत तिने श्रीगुरुंना वंदन केले आहे. तर शेवटच्या ओवीत चक्रधराविषयी आदरभाव व्यक्त केला आहे. अशा प्रकारच्या सुरवातीला आणि शेवटच्या दोनच ओव्या पहावयास मिळतात ही ओवी अडीच चरणाची आहे. जसे -

१. नमो आदिबीजा परमार्था सहजा<br>
श्रीगुरु आदिराजा : नमन माझें : ।। १ ।।

२. विखायांवे गळदरे त्येजवीले दातारे :<br>
स्वामी चक्रधरें : महदंबेसी : ।। ७५ ।।

परंतु या दोन ओव्यांमधून आपणाला महदंबेच्या सहजतेची व प्रतिभेची माहिती मिळते.

या ओव्यामधून आपले गुरु चक्रधर यांच्यासाठी महदंबेने स्वत:ला वाहून घेतले होते. याचेही प्रत्यंतर जाणवते. ही रचना जरी संख्येने अल्प असली तरीही त्यातून नक्कीच महदंबेच्या प्रतिभेचा मोहर आणि दरवळ दरवळत राहिला आहे व त्याचा सुवास वाचकांना तिच्या शब्दाद्वारे मिळतो आहे. ही रचना उत्स्फूर्त असल्यामुळे यात मोड तोड झालेली पहावयास मिळत नाही. या उत्स्फूर्ततेपोटीच या गर्भकांडाच्या ओव्यांना गेयता प्राप्त झाली आहे. एकंदर या दोन ओव्यामधून गर्भकांडाच्या ओव्यात मध्यंतरीचा भाग हा चक्रधर, गोविंद्रप्रभू आणि नागदेवाचार्य यांच्या गुणगौरवाचा असावा असे मानावयास हरकत नाही.

एकंदर या गर्भकांडाच्या ओव्यांचे स्वरूप जरी प्रासंगिक असले तरी ते उत्स्फूर्त आहे. आणि उत्स्फूर्त असल्यामुळे ते अंतरंगाच्या ओलाव्यात भिजलेले आहे. आणि त्यामुळे महदंबेच्या उत्स्फूर्त भक्तिपोटीच त्या आकाराला आल्या आहेत.

.....

प्रकरण पाचवे

## संदर्भ साहित्य


१. महदंबेचे धावळे, भाग ३२वा, सुहासिनी इर्लेकर, आध्यात्मिक साहित्य प्रकाशन, हैद्राबाद, प्रथमावृत्ती, १९७७, पृ.क्र. १३.

२. श्रीगोविंदप्रभुचरित्र, (संपा) व.दी. कुलकर्णी, व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृती पहिली, १९८०, लीळा क्रमांक २२४, पृ.क्र. ५२-५९.

३. उ. नि.

४. स्मृतीस्थळ, (संपा) वा.ना. देशपांडे, कॉंन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९५६, स्मृती क्रमांक ३.

५. उ. नि.

६. श्रीचक्रधारनिरुपीत श्रीकृष्णचरित्र, महानुभाव गोपीराज.

७. उ. नि.

८. उ. नि.

९. उ. नि.

१०. महदंबेचे धावळे, सुहासिनी इर्लेकर, साहित्य प्रकाशन, अमरावती, प्रस्तावना, प्रथमावृत्ती, १९७७, पृ.क्र. २६.

११. महदंबा - आद्य मराठी कवयित्री, (संपा) वा.ना. देशपांडे, कॉण्टिनेंटल प्रकाशन, टिळक रोड पुणे २, प्रस्तावना, पृ.क्र. १६ ते २४.

१२. उ. नि.

१३ उ. नि.

१४. आद्य मराठी कवयित्री (संपा) वा.ना. देशपांडे, कॉण्टिनेंटल प्रकाशन, टिळक रोड, पुणे-२, द्वितियावृत्ती, १९५६, पृ. १७.

१५. गोविंदप्रभूचरित्र, (संपा) वि.भि. कोलते, अरुण प्रकाशन, मलकापूर लीळा क्र. २२४.

१६. आद्य कवयित्री महदंबा, प्रस्तावना, (संपा) वा.ना. देशपांडे, कॉण्टिनेंटल प्रकाशन, टिळक रोड, पुणे, द्वितीयावृत्ती, १९५६, पृ.क्र.१३.

१७. संशोधन साधना; व.स. जोशी, १९७६; पृ.क्र. १३३.

१८. महाराष्ट्र संशोधन पत्रिका, व.वि. पारखे, पृ.क्र. २४-२.

१९. महाराष्ट्र संशोधन पत्रिका, आराध्य मुरलीधर शास्त्री, २४-३.

२०. आद्य मराठी कवयित्री प्रस्तावना, वा.ना. देशपांडे, कॉण्टिनेंटल प्रकाशन, पुणे, द्वितियावृत्ती, १९५६, पृ.क्र. १३.

.....